# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२२३१०६

---

## निविदा सुचना

क्रं.गों.वि/विलेवि/२७८९/२०१६ दिनांक: ०१/०२/२०१६

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील तृतिय दिक्षांत समारंभासाठी लागणारे सुवर्ण पदके तयार करण्याकरिता पंजीबध्द सुवर्णकाराकडुन मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदा खालील अटीवर स्वीकारण्यात येतील.

| अ.क्रं | पदकाचे विवरण | अंदाजित किंमत | सुरक्षा जमा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २४ सुवर्ण पदके तयार करणे | १,५९,३५७/– | ५,००० | १० (दिवस) |

नोट :. १) अनामत रक्कम वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नांवे देय कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेच्या धनाकर्षच्या स्वरुपात जमा करावे.

२) सुवर्णकाराला मान्यता प्राप्त विद्यापीठाची सुवर्ण पदके तयार करण्याचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल.

३) सुवर्ण पदकाची ढाई विद्यापीठ पुरविणार आहे.

४) निविदा अर्जाचे विहीत प्रारुप (अटी व शर्तीसह) विद्यापीठाचे संकेतस्थळ **www.unigug.org** किंवा **www.gondwanadigitaluniversity.ac** येथे उपलब्ध आहे.

५) निविदा स्वीकारण्याची शेवटची तारीख १०फेब्रुवारी २०१६,वेळ दुपारी ३.०० पर्यंत

६) निविदा उघडण्याची तारीख १०फेब्रुवारी २०१६, वेळ दुपारी ४.०० पर्यंत

७) निविदा स्वीकारण्याचा पत्ता वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालय, एम.आय. डी.सी.रोड, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

८) कोणतेही कारण न दर्शविता एक किवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

**(बा.स.राठोड)**
**वित्त व लेखा अधिकारी**
**गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली**

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

## निविदा अर्ज

**प्रति,**

मा. वित्त व लेखा अधिकारी,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय** :— सुवर्ण पदके तयार करुन घेणे बाबत निविदा

**संदर्भ** :—विद्यापीठाची जाहिरात कं. गो.वि/वि.लेवि/२७८९/२०१६, दि:०१/०२/२०१६

**महोदय,**

मी श्री —————————————————————— संदर्भित जाहिरातीच्या अनुषंगाने तयार केलेला निविदा अर्ज वाचला असुन त्यात सादर केलेल्या अटी व शर्तीशी पूर्णपणे सहमत आहे. कराराप्रमाणे करु इच्छीणाऱ्या सुवर्ण पदके तयार करुन पुरवठा करण्यास तयार असल्याचे हया निविदेद्वारे लिहून देत आहे.

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव : ——————————————————————————

२) सार्थाचे नांव व संपूर्ण पत्ता : ——————————————————————————
——————————————————————————

३) नोंदणी प्रमाणपत्र : जोडले आहे / नाही

४) सेलटॅक्स/ क्लिअरन्स प्रमाणपत्र किंवा : जोडले आहे / नाही
विक्रीकर भरण्यापासून सुट मिळाली असल्यास
तसे सक्षम अधिका—याचे प्रमाणपत्र.

५) इन्कमटॅक्स क्लिअरन्स प्रमाणपत्र/ इन्कमटॅक्स रिटर्न : जोडले आहे / नाही
प्रमाणपत्रे (निविदेच्याअंतिम तारखेपर्यंत ग्राहय असलेले)

६) विक्री करारसंबंधीचा नोंदणी क्रमांक व विक्रीकर : जोडले आहे / नाही
भरल्याचे प्रमाणपत्र.

७) अर्जासोबत जोडावयाच्या अनामत रकमेची
माहिती/सुट प्रमाणपत्र : जोडले आहे / नाही

| (बॅकेचे नांव) | शाखा | धनाकर्ष क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

उपरनिर्दीष्ठ सादर केलेली माहिती पूर्णपणे सत्य आहे.

सार्थाचे नांव :—————————————————— सेल टॅक्स क्र. ————————
संपुर्ण पत्ता : —————————————————— दुरध्वनी क्र. ——————————
——————————————————————————भ्रमनध्वनी क्र. ——————————

ठिकाण :

दिनांक : सही व शिक्का

# निविदाधारकाने द्यावयाचे वचनपत्र

मी ——————————————————————————————— घोषीत करतो की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली विद्यापीठाने निविदा प्रपत्रासोबत सादर केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तद्नुषंगाने ठरवुन दिलेल्या अनामत/ सुरक्षा रकमेचा मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे नांवे बॅक ड्रॉफ्ट (बॅकेचे नांव —————————————————— ड्रॉफ्ट क्रमांक ———————— रुपये तयार करुन सोबत सादर केलेला आहे.

ठिकाण :
दिनांक :

निविदा धारकाची सही —————————
पूर्ण नांव ——————————————
संपूर्ण पत्ता ——————————————
———————————————————
दुरध्वनी क्र. भ्रमणध्वनी क्र. ———————
सेल टॅक्स क्र. ——————————————
———————————————————

## क रा र ना मा

विद्यापीठाने ठरवून दिलेल्या अटी व शर्ती/ नियमांचे माझ्याकडून उल्लंघन किंवा विद्यापीठाच्या आदेशाप्रमाणे कोणत्याही बाबतीत आवश्यक ती कार्यवाही सात दिवसाच्या आत न केल्यास कायदेशीर कार्यवाही घेण्याचा व करारनामा ताबडतोब रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाला राहील. करारनामा रद्द झाल्यास अनामत/ सुरक्षा रक्कमेवर माझा कोणताही अधिकार राहणार नाही असे शपथेवर लिहून देत आहे.

ठिकाण : करारनामा लिहून देणाराची सही —————————

दिनांक : पूर्ण नांव ——————————————————

(रबरी शिक्का)

साक्षीदार : १) पुर्ण नांव ———————————————— सही ———————

२) पुर्ण नांव ————————————————— सही —————

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**निविदा सुचना क्र.गोवि/विलेवि./२७८९/२०१६, दिनांक: ०१/०२/२०१६**

# अटी व शर्ती

१) निविदा अर्जाचे विहित प्रारुप (अटी व शर्तीसह) विद्यापीठाचे संकेत स्थळ **www.unigug.org** किंवा **www.gondwanadigitaluniversity.ac** येथे उपलब्ध आहे.

२) निविदा व्दि – लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत असुन त्याकरिता लिफाफा क्र. १ (तांत्रीक) मध्ये अनामत रक्कमेचा डी.डी. विक्रीकर, आयकर क्लिअरन्स प्रमाणपत्र, अनामत रक्कम किवा विक्रीकर भरण्यापासुन सुट मिळाली असल्यास तसे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, सार्थ/फर्म नोंदणी प्रमाणपत्र, विक्रीकरासंबंधी नोंदणी क्रं. तसेच इतर पुरक माहिती व प्रपत्र असावे.

३) सोबत संलग्न विवरण पत्राची दर सुची असणे आवश्यक आहे. दोन्ही (व्यवसाईक बिड आणि तांत्रिक बिड) मोहोरबंद लिफाफे (क्र. १ व २) लिफाफा क्रं. ३ मध्ये मोहोरबंद करुन लेखा शाखेत वेळेच्या आत सादर करण्यात यावे.

४) मोहोरबंद निविदा लिफाफे स्विकारण्याची अंतिम तारीख निविदा प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक १०/०२/२०१६ पर्यंत किंवा त्यापूर्वी कार्यालयीन दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

५) प्राप्त निविदेचे मोहोरबंद लिफाफे दिनांक १०/०२/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी यांचे समक्ष निविदाधारक असल्यास त्यांचे समोर उघडण्यात येतील. परंतु काही कारणास्तव उपनिर्दीष्ट अधिकारी उपलब्ध नसल्यास त्यांच्या सोईनुसार पुर्वसुचना न देता उघडण्यात येऊ शकतील.

६) B.S.T./C.S.T./VAT/नोंदणी क्रमांक नसलेल्या/ अटी घातलेल्या किंवा संदिग्ध निविदा स्विकारल्या जाणार नाही.

७) रु.६,६४०/– (मजुरीसह) प्रती सुवर्ण पदक दराने एकुण २४ सुवर्ण पदके तयार करुन घ्यावयाची आहेत. पुरवठादारांनी सुवर्ण पदकांची किंमत विचारात घेवुन सुवर्ण पदकांत किती ग्रॅम सोने राहील याची माहिती सोबत जोडलेल्या विवरण पत्रात नमुद करावयाची आहे. **जे पुरवठादार जास्त वजनाचे सोने दर्शवतील त्या आधारावर त्यांची पदके तयार करण्यासाठी निवड करण्यात येईल.**

८) सुवर्ण पदकाचा आकार वर्तुळाकार असुन सुवर्ण पदकाची ढाई विद्यापीठ पुरवणार आहे.

९) सुवर्ण पदकांत कोणत्याही प्रकारची खराबी अथवा त्रुटी आढळल्यास पुरवठादारास दुरुस्ती करुन देणे अथवा ठरलेल्या किंमतीत दुसरे पदक तयार करुन देणे बंधनकारक राहील.

१०) दिक्षांत समारंभाच्या कमीत कमी ०५ दिवस आधी संपुर्ण सुवर्ण पदके विद्यापीठास हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

११) विद्यापीठाने दिलेल्या सुवर्ण पदकांच्या यादीनुसार तेवढयाच प्रमाणात प्लॅस्टीक डबी, रिबन विद्यापीठाचे सील व ढाई नावासह पदकासोबत पुरविणे बंधनकारक राहील.

१२) पुरवठादाराला विद्यापीठाची सुवर्ण पदके तयार करण्याचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

१३) सोन्याचा दर ज्या दिवशी निविदा उघडण्यात येतील त्या दिवशीच्या वर्तमानपत्रातील दरानुसार निश्चीत करण्यात येतील.

१४) दराबाबत कोणत्याही प्रकारच्या वाटाघाटी होणार नाहीत.

१५) दर करारात नमुद केलेले दर विक्रीकर, जकात, बांधणी खर्च, वाहतुक व हमाली इत्यादी खर्चासह FOR विद्यापीठाच्या लेखा शाखेत अथवा त्यांनी सुचविलेल्या ठिकाणी पोहचविण्यासाठी असेल.

१६) **प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे. याबाबत कोणत्याही प्रकारची कारणे अथवा स्पष्टीकरण देणे विद्यापीठास बंधनकारक नाही.**

१७) मान्य दराचा कालावधी तिसऱ्या दिक्षांत समारंभापुरता मर्यादीत राहील.

१८) दर मंजुर होणाऱ्या सार्थाने तीन दिवसांचे आत रुपये १००/— च्या स्टॅम्प पेपरवर दोन साक्षीदारांच्या समक्ष लेखी करारनामा लिहून देणे आवश्यक आहे. तसे न केल्यास द्वितीय क्रमांकाच्या सार्थाला दर कराराचा अधिकार प्राप्त होईल. प्रथम क्रमांकाच्या सार्थाची अनामत/ सुरक्षा रक्कम जप्त करणे किंवा दंड आकारण्याचा अधिकार विद्यापीठाला आहे.

१९) अनामत/सुरक्षा रक्कम वर्ष संपेपर्यंत कोणत्याही दर करार झालेल्या सार्थास परत केल्या जाणार नाही व अनामत/सुरक्षा रकमेवर कोणत्याही प्रकारचा व्याज किवा विलंब शुल्क दिल्या जाणार नाही.

२०) निविदा प्रपत्रात नमुद करण्यात आलेली संख्या अंदाजित असुन प्रत्यक्ष मागणीमध्ये घट किवा वाढ करण्याचे तसेच निविदेत दर्शविलेल्या काही अनावश्क पदकांबाबतची मागणी रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने सुरक्षित ठेवले आहे.

२१) निविदा प्रपत्रासोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये मान्य केलेल्या नमुन्यानुसारच पुरवठा करावा लागेल. पुरवठा निकृष्ट दर्जाचा आढळल्यास त्याचे शोधन करण्यात येणार नाही. पुरवठयासोबत पोच पावती (D.M.) पाठविणे आवश्यक आहे.

२२) कार्यालयीन आदेशानुसार मुदतीच्या आत पुरवठा न केल्यास संबंधित अनामत/सुरक्षा रकमेतुन अथवा इतर देय असलेल्या सुरक्षा रक्कम पूर्णपणे जप्त करणे/ विलंबाबाबत दंड आकारणे हे सर्वस्वी विद्यापीठावर अवलंबून असून ते पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

२३) योग्य स्थितीत पुरवठा केलेल्या पदकांची देयके तीन प्रतीत सादर करावे लागेल. तसेच रु.५०००/— किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या देयकास राजस्व तिकीट (Revenue Stamp) लावावे लागेल.

२४) पुरवठादारास पदकांच्या रक्कमेचे किवा अनामत रक्कमेचे शोधन धनादेशाव्दारे किवा RTGS/NEFT व्दारे करण्यात येईल.

२५) हया उपर कोणतीही अडचण उद्‌भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय देण्याचा अधिकार मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना राहील.

उपरोक्त अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचले असून समजून घेतले आहे. सदर सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्याचे तंतोतंत पालन करण्याची हमी देत आहो.

ठिकाण :

दिनांक :

निविदाधारकाची सही———————————————

(रबरी शिक्का)

# दरसुची

## सुवर्ण पदके

| अ.क्रं. | पदकांची संख्या | प्रती सुवर्ण पदकं किंमत | प्रत्येक सुवर्ण पदकांत वापरण्यात येणारी चांदी (वजनासह) | प्रत्येक सुवर्ण पदकांत वापरण्यात येणारे सोने (वजनासह) | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २४ | ६,६४०/— | | | |

टिप :— १) २४ सुवर्ण पदकात किती ———— ग्रॅम चांदी वापरणार आहे त्यात सोने किती ग्रॅम ———— राहील हे पुरवठादाने दर्शवावे.